# प्रकरण सहावे

## उपसंहार

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## प्रकरण ६ वे

## उपसंहार

कथा हा वाङ्मय प्रकार प्राचीन काळापासून चालत आलेला आहे. हा वाङ्मय प्रकार सर्वात जुना, तितकाच तो नवीन आहे. कथा ऐकण्याची हौस मानवी मनात असते. कथा कथनाची व निवेदन करण्याची प्रवृत्ती मानवाच्या ठिकाणी आहे. त्यामुळे कथा हे वाङ्मय विविध अंगाने बहरलेले आहे. कथेला हरिभाऊ आपटे यांनी 'स्फुट गोष्ट' या नावाने संबोधले. नंतर तिचे लघुकथा म्हणून नामकरण केले. कथा खऱ्या अर्थाने फुलू लागली. य. गो. जोशी, ना. ह. आपटे, शि. म. परांजपे, कोल्हटकर यांनी बोधपर, कल्पनारम्य, विनोदी लेखन करून कथालेखन समृद्ध केले. यात स्त्री लेखिकांचा सहभाग होता. काशीबाई कानिटकर, गिरीजाबाई केळकर, लघुकथेचा विकास खऱ्या अर्थाने करमणूक, मनोरंजन, यशवंत, सत्यकथा या मासिकांमुळे झाला. वि. स. गुर्जर यांच्या लघुकथा लोकप्रिय आहेत. त्यांच्या बहुसंख्य लघुकथा अनुवादित आहेत. त्या घटनाप्रधान आहेत. प्रसन्न भाषा शैलीमुळेच त्या वाचनीय ठरल्या आहेत. त्यानंतर दिवाकर कृष्ण यांनी कथालेखन केले. त्यात त्यांनी कथेपासून अंतर्मुख असणारी कथा बर्हिमुख केली. लघुकथेला ना. सी. फडके, वि.स. खांडेकर यांनी आकार दिला.

मराठी कथेत १९४० पासून वेगवेगळे प्रवाह येऊ लागले. दुसऱ्या महायुद्धाचा परिणाम सामान्य लोकांच्या जीवनावर झाला. त्यांच्या जीवनात येणारा किळसवाणेपणा, क्रूरपणा, गलिच्छपणा, आळशीपणा माजला होता. त्याचेच चित्रण कथेमध्ये येऊ लागले. पु. भा. भावे,

गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले आणि व्यंकटेश माडगूळकर यांनी मराठी नवकथेला रंग, रूप आणि आकार दिला. मराठी मनोव्यापारांचे दर्शन घडविताना आणि मानवी मनाच्या तळाचा शोध घेताना अनुभवाला असलेली चमत्कृती गोखल्यांच्या कथेतून दिसते. गंगाधर गाडगीळ यांच्यामुळे कथेला नवी झेप घेण्याचे सामर्थ्य लाभले. पु. भा. भावे यांनी तर नवकथेच्या बाबतीत दोन पावले पुढे टाकली. सूक्ष्म मनोविश्लेषण, वेगवेगळी वैशिष्ट्यपूर्ण पात्रे, भाषाशैली हे त्यांच्या कथेचे विशेष आहेत. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथेतून खेड्यातील माणसांचे चित्रण आले आहे. नवकथा सर्वांगाने बहरून आली. नवीन वाङ्मयीन प्रवाह सुरू झाले. ग्रामीण कथा, दलितकथा, स्त्रीवादी कथा, विज्ञानकथा यांमुळे कथेला एक वेगळे स्वरूप आल्याचे दिसून येते. कथाचे अंग विकसित झाल्याचे लक्षात येते.

१९६० नंतर मराठी कथेचे स्वरूप पाहता नागरकथेत तोचतोपणा आलेला दिसतो. मध्यमवर्गीयांची दु:खे कुरवाळण्यावर भर, एकूणच मराठी कथेचा विस्तार झालेला नव्हता, दलित जीवनातील दु:ख यापूर्वी व्यक्त केले नव्हते ते चित्रण करण्याचे काम श्री. म. माटे व व्यंकटेश माडगूळकरांनी केले. स्वातंत्र्यानंतर शासनाच्या शिक्षण प्रसारामुळे खेड्या- पाड्यापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचली. उपेक्षितांची आणि अस्पृश्यांची मुले या शिक्षणामुळे शिकू लागली. ग्रामीण कथा लिहिणारे द. मा. मिरासदार, शंकर पाटील, रणजित देसाई, आनंद यादव, महादेव मोरे यांनी ग्रामीण जीवनाचे नवनवे भाग वाचकांसमोर आणण्याचा प्रयत्न केला. दलित कथेतून शिकलेल्या दलित लोकांनी प्रस्थापितांच्या

विषयी विद्रोह व्यक्त करण्यासाठी कथेचा माध्यम म्हणून वापर केला. शंकरराव खरात, बाबूराव बागूल, अण्णा भाऊ साठे, चारूता सागर यांनी दलितांचे वास्तववादी जीवन रेखाटले. १९६० नंतर विद्याधर पुंडलिक, पानवलकर, जी. ए. कुलकर्णी, जयवंत दळवी, अनंत जातेगावकर यांनी कथालेखन केले. १९७० नंतरची कथा विघटनशील वाटते. औद्योगिकीकरण, परिणामी जीवनात आलेली यांत्रिकता यांच्याशी तोल साधते. यावेळीचे वैशिष्ट्यपूर्ण ग्रामीण कथालेखन करणारे श्रीराम गुंदेकर, दिलीप चित्रे हे महत्त्वाचे लेखक आहेत.

आजच्या मराठी कथेला वास्तवाचे आकर्षण आहे. व्यक्तिमनाचे साक्षात दर्शन घडविण्याचा प्रयत्न ती करते. आजची कथा ही अतिशय सूक्ष्म झाली आहे.

प्रस्तुत प्रबंधिकेत पहिल्या प्रकरणामध्ये मराठी कथा वाङ्मयाचा परिचय करून दिला आहे. दुसऱ्या प्रकरणात अनंत मनोहर यांच्या साहित्याचे स्वरूप थोडक्यात उलगडून दाखविले आहे. त्यात त्यांच्या कादंबऱ्या व ललित लेख यांचा विचार केला आहे.

तिसऱ्या प्रकरणात अनंत मनोहरांच्या 'देवकाठी' व 'बिल्वपत्र' या दोन कथासंग्रहांचा आशय व अभिव्यक्तिदृष्ट्या विचार केला आहे. त्यांच्या कथा या वेगळेपणामुळे त्या कथेत तोचतोपणा येत नाही. त्यांनी वेगवगेळे प्रश्न मांडले आहेत. अभिव्यक्त करताना वापरलेली भाषाशैली, संवाद, वातावरण निर्मिती, व्यक्तिचित्रण यांचा वापर करून कथा वेगवेगळ्या अंगांनी बहरविली आहे.

चौथ्या प्रकरणात 'कर्कोटक' या कथासंग्रहाचा आशय व

अभिव्यक्तिदृष्ट्या विचार केला आहे. या कथासंग्रहातील कथांमधून वेगवेगळ्या स्तरातील लोकांच्या समस्या आल्या आहेत. या कथासंग्रहातील पात्रेही उच्चशिक्षित आहेत. त्यामुळे त्यांच्या पात्रांत इंग्रजी भाषेचा वापर अधिक केला आहे. माणसांच्या वृत्ती- प्रवृत्ती दाखविण्याचे काम अनंत मनोहरांनी केले आहे. दररोजच्या जीवनातील चढाओढ दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच राजकारणी लोकांच्यावर कितपत विश्वास टाकला पाहिजे हे त्यांनी दाखवून दिले आहे. काही प्रेमकथा लिहिल्या, काही कथांतून सांस्कृतिक फरकामुळे कशी वाताहत होते याचे चित्रण ते करतात. राजकीय कथा लिहिल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या कथांचा अभ्यास केला आहे.

पाचव्या प्रकरणात व्यक्तिचित्रण आणि सामाजिक संदर्भ यांचा विचार केला आहे. व्यक्तिचित्रणाच्या बाबतीत त्यांची कथा मनोविश्लेषणापेक्षा घटनाप्रधानतेला अधिक महत्त्व देताना दिसते. काही कथांमधून स्वप्नाळूपणाचे रंग दाखविले आहेत. तर काही कथा स्वप्नाळूपणात ते स्वत:ला हरवून देत नाहीत. त्यांची कथा ही घटनात्मक स्वरूपाची आहे. समाजातील घडामोडींवर आहे. त्यामुळे त्या वास्तवदर्शी आहेत हे लक्षात येते.

त्यांच्या कथेतील स्त्रीपुरुष प्रतिमा मध्यमवर्गीय जीवनापेक्षा वेगळ्या नाहीत. परंतु त्या व्यक्ती परिस्थितीला न कवटाळता प्रसंगी या व्यक्तींना संघर्ष करावा लागतो. म्हणून त्यांच्या अनेक कथांच्यापैकी काही कथा संघर्षमयी कथा आहेत.

समाजाचे विदारक जीवनाचे चित्रण अनंत मनोहर करतात. शिवाय

त्यांच्या कथेत भूतकालीन समाजमनाचा सुंदर मिलाफ दिसतो.

अनंत मनोहरांची भाषा साधी सरळ बोलीभाषा आहे. तशी उच्चवर्गीय लोकांच्या इंग्रजी भाषेचा वापर त्यांनी केला आहे. सभोवतालच्या जगात जे बोलले जाते त्याला त्यांनी कथात्मक रूप दिले आहे. त्यांच्या कथेतील संवाद नाट्यमय असून कथेतील प्रसंग अनुभूतीशी प्रामाणिक राहून चित्रित केलेले असतात. कथा ह्या मानवतावादी मूल्यांची जोपासना करणारी, नव्या विचारांची प्रेरणा असलेली बोलीभाषेतून व्यक्त होणारी प्रादेशिक वैशिष्ट्ये जोपासणारी अशी त्यांची कथा आहे. या सर्व वैशिष्ट्यांचा विचार उदाहरणांसह प्रस्तुत प्रबंधिकेत केला आहे.

**अनंत मनोहर यांच्या कथा वाङ्मयाचा अभ्यास केल्यानंतर हाती आलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे :**

१) अनंत मनोहरांच्या कथा मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण करतात.

२) अनंत मनोहरांच्या कथेत प्राणी जीवनावर विशेष प्रकाश टाकला आहे.

३) मानवी वृत्ती- प्रवृत्तीचे चित्रण समर्थपणे ते करतात.

४) प्रेम जीवनातील श्रीमंतीचा अडसर दाखवून दिला आहे. त्यातून नायक-नायिकेचा होणारा गोड गैरसमज मार्मिक शैलीत प्रकट केला आहे.

५) जिद्दीने शिक्षण घेणारी स्त्री- पुरुषांची चित्रणे आली आहेत.

६) मानवी जीवनातील विविध समस्या आणि त्या समस्यांवर मात करणारी माणसे यांचे चित्रण केले आहे.

७) त्यांच्या कथेत बहुतेक करून परदेशातील वर्णने आली आहेत.

८) बहुतेक पात्रेही उच्चशिक्षित आहेत.

९) कामगार प्रश्न, जातीयता, आर्थिकतेमुळे होणाऱ्या समस्या या त्यांच्या कथेतून मांडल्यामुळे वास्तववादी लेखक त्यांना म्हणता येईल.

१०) समाजातील अनिष्ट रूढी, परंपरांना विरोध करणारी स्त्री-पुरुषांची चित्रणे कथेत येतात.

११) सामाजिक समस्या मांडल्या तशाच राजकीय लोकांच्या वृत्ती- प्रवृत्ती टिपल्या आहेत.

१२) कथेत उदाहरण पटवून देताना संस्कृतातील दाखले दिले आहेत.

१३) स्त्री पात्रे ही खंबीरपणे रेखाटली आहेत. काही स्त्रिया प्राणाची पर्वा न करणाऱ्याही आहेत.

१४) त्यांच्या कथेतील स्त्रिया आधुनिक विचारसरणीच्या आहेत.

१५) भारतीय स्त्रियांबरोबर परदेशी स्त्रियांची व्यक्तिचित्रणे, त्यांचे स्वभाव त्यांनी रेखाटले आहेत.

१६) परदेशात राहणाऱ्या भारतीय स्त्रिया आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न करतात.

१७) अनंत मनोहरांच्या कथेतील स्त्रिया रसिक आहेत. तशाच त्या संयमीही आहेत.

१८) दोन भिन्न धर्मांतील स्त्री- पुरुष, पति- पत्नी म्हणून वावरताना उभयतांचा होणारा भावनिक कोंडमारा स्पष्ट केला आहे.

१९) समाज वास्तव, सांस्कृतिक वेगळेपण, भिन्न संस्कृतींतील फरक हे त्यांच्या कथेचे विषय आहेत.

२०) काही पात्रेही बिलंदर आहेत तर काही सदसद्‌विवेक बुद्धी वापरणारी आहेत.

२१) उच्चशिक्षणातून जीवनाकडे पाहण्याचा बदललेला दृष्टिकोन आणि त्यातून निर्माण झालेले ताणतणाव, समस्या इत्यादींचे परिणामकारक चित्रण प्रस्तुत कथासंग्रहातील कथांमधून पाहवयास मिळते.

२२) काही कथांतून कोकणाचे प्रादेशिक चित्रण ते करतात.

२३) कोकणी लोकांच्या वृत्ती- प्रवृत्ती, त्यांची जीवनाकडे बघण्याची प्रवृत्ती त्यांच्या कथेतून अभिव्यक्त करतात.

२४) समाजातील व्यंग्यावर बोट ठेवून समाजातील माणसांचे वास्तवदर्शी चित्रण करतात.

२५) अनंत मनोहर यांनी आपल्या कथांतून वेगवेगळे विषय हाताळलेले आहेत. त्यात दारिद्र्य, अंधश्रद्धा, प्रेमकथा, नातीगोती अशा विषयांच्या कथा आल्या आहेत.

२६) स्त्री- पुरुषांच्यामध्ये सात्त्विक प्रेमाची झालर आहे. त्यामुळे प्रेमासारख्या नाजूक विषयावरही कथा लिहिताना कोठेही मादकता येत नाही.

२७) चाळीत राहताना मानसिक कुचंबणा कशी होते याचे चित्रण ते कथेत समर्थपणे घडवितात.

२८) अनंत मनोहरांच्या कथेतील पात्रे उच्चशिक्षित असल्यामुळे इंग्रजी भाषेचा वापर अधिक केला आहे.

२९) 'देवकाठी', 'बिल्वपत्र' आणि 'कर्कोटक' या कथासंग्रहांतील निवेदन शैली प्रथम व तृतीय पुरुषी अशी दोन्ही पद्धतीने येते.

३०) कथासंग्रहातील संवाद चटकदार, प्रसंगाला अनुसरून आले आहेत.

३१) म्हणी, वाक्यप्रचार, उपमा, प्रतिमा यांचा वापर केल्यामुळे कथासंग्रहाचे सौंदर्य व भाषेचे सौंदर्य वाढले आहे.

३२) अनंत मनोहरांनी जिवंत व्यक्तिरेखा साकारल्या आहेत.

३३) सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कथासंग्रहाचे शीर्षके, 'देवकाठी','बिल्वपत्र' आणि 'कर्कोटक' अतिशय सार्थ ठरणारी आहेत.

३४) समाजाचे वास्तव चित्रण त्यांच्या कथेत येते.

## अ) आधार सूची

### १) कादंबरी

१) मनोहर अनंत , : 'राब', कॉन्टिनेंटल प्रकाशन, विजयानगर पुणे- प्रथमावृत्ती १९८१.

२) मनोहर अनंत, : 'दोन मुठी तांदूळ', श्री. विशाखा प्रकाशन, प्रथमावृत्ती १९७५.

३) मनोहर अनंत, : 'अरण्यकांड'.

४) मनोहर अनंत, : 'दक्षिणवारा', सुयोग प्रकाशन, प्रथमावृत्ती १९९१.

५) मनोहर अनंत, : 'शहाणा उंटावरचा', अस्मिता प्रकाशन, पुणे.

### २) कथासंग्रह

१) मनोहर अनंत, : 'देवकाठी', मेघदूत प्रकाशन, प्रकाशन क्रमांक २, प्रथमावृवृत्ती सप्टेंबर १९८४.

२) मनोहर अनंत, : 'बिल्वपत्र', सुयोग प्रकाशन, प्रथमावृत्ती १९९१.

३) मनोहर अनंत, : 'कर्कोटक', मधुराज पब्लिकेशन्स प्रा. लि., पुणे प्रथमावृत्ती १९९१.

### ३) ललित लेख

१) मनोहर अनंत, 'गलोल'.

## आ) संदर्भ सूची

१) अदवंत म. ना., : 'प्रदक्षिणा', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे सहावी आवृत्ती १९८६.

२) बांदिवडेकर चंद्रकांत : 'मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप, संपादक पवार गो. म., हातकणंगलेकर म. द.

३) भोसले द. ता., : 'ग्रामीण साहित्य : एक चिंतन', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८८.

४) चवरे रा. गो., : 'मराठी कथा : प्रवृत्ती आणि प्रवाह', १९९५ मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती.

५) ढसाळ नामदेव,: 'दलित पँथर भूमिका', आम्ही, दिवाळी अंक, १९५३.

६) देशपांडे अ. ना., : 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास : भाग २: १९२० ते १९५०', पुनर्मुद्रण, १९७०, व्हीनस प्रकाशन,
'तपश्चर्या' पुणे.

७) धोंगडे अश्विनी , : 'स्त्रीवादी साहित्य व समीक्षा'.

८) गाडगीळ गंगाधर, : 'नवकथा :स्वरूप आणि आक्षेप'.

९) हातकणंगलेकर म. द., : 'मराठी कथा : रूप आणि परिसर', प्रथमावृत्ती मार्च १९८६.

१०) कुलकर्णी दा. वि., : 'मराठी कथा: स्वरूप आणि आस्वाद', स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन, प्रथमावृत्ती १९७६.

११) कुलकर्णी वा. ल., : 'मराठी नवकथेचे सामर्थ्य', 'वाङ्मयीन दृष्टी आणि दृष्टिकोन', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई ३४ द्वितीयावृत्ती.

१२) किरवले कृष्णा, : 'दलित चळवळ आणि साहित्य', मौजिक प्रकाशन, १९९६.

१३) कोत्तापल्ले नागनाथ, : 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९८५.

१४) कुलकर्णी गो. म. : 'मराठी ग्रामीण साहित्य : परिसर आणि प्रवाह', मेहता पब्लिकेशन्स हाऊस, पुणे १९९९.

१५) लिंबाळे शरणकुमार, : 'साहित्याचे निकष बदलावे लागतील', दिलीपराज प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती २००५.

१६) मुलाटे वासुदेव, : 'ग्रामीण कथा : स्वरूप आणि प्रेरणा', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९९२.

१७) मेश्राम योगेंद्र, : 'दलित साहित्य : उद्‍गम आणि विकास', द. सा. उ. प्र. पे. : आणि प्रेरणातत्त्वे.

१८) नलगे चंद्रकुमार, : 'ग्रामीण कथा : प्रेरणा व विकास ' ग्रामीण वाङ्‌मयाचा इतिहास, संपा. चंद्रकुमार नलगे, प्रथमावृत्ती सप्टेंबर १९९६.

१९) फडके भालचंद्र, : 'प्रतिष्ठान', सप्टेंबर १९७०.

२०) फडके ना. सी. , : 'प्रतिभासाधन', देशमुख आणि कंपनी, दहावी आवृत्ती, पुणे १९७०.

२१) शेवडे इंदूमती : 'मराठी कथा :उद्‍गम आणि विकास', सौमय्या पब्लिकेशन प्रा. लि. मुंबई, द्वितीयावृत्ती १९८२.

२२) सोमण अंजली, : 'मराठी कथेची स्थिती गती', प्रतिमा प्रकाशन, पुणे १९९५.

२३) सरवदे वि. स. , : 'गोष्टी व लघुकथा', मराठी साहित्य समालोचन, १८१८-१८३४, इंदूर १९३७.

891.462
KAM
T16121